लोकमत

लागला तेवढा भाग सोडून अन्य   केला.



शिवाजी विद्यापीठातर्फे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शनासाठी देण्यात येणारा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रदान केला. यावेळी शेजारी विलास नांदवडेकर, ए. एम. शेख, पी. टी. गायकवाड, अमर सासने, आदी उपस्थित होते.

# न्यू कॉलेजने पटकाविला 'नागेशकर पुरस्कार'

## सलग चौथ्यांदा पुरस्कारावर कोरले नाव : सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शन

▪ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील न्यू कॉलेजने यंदा सलग चौथ्यांदा सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शनासाठीचा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार पटकविला. शिवाजी विद्यापीठाच्यावतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह निवडक क्रीडापटूंना सन २०१८-१८ या शैक्षणिक वर्षातील उत्कृष्ट कामगिरीबद्दलच्या पुरस्काराप्रीत्यर्थ देण्यात येणारा

> सलग चौथ्यावेळी हा पुरस्कार आम्ही पटकविल्याचा खूप आनंद होत आहे. विविध क्रीडा प्रकारातील खेळाडूंसाठी महाविद्यालयात आवश्यक त्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे कामगिरी उत्कृष्टपणे होत आहे.
>
> **-डॉ. व्ही. एम. पाटील**, प्राचार्य

फिरता चषक प्रदान करण्यात आला. या महाविद्यालयाने सलग चार वर्षे हा चषक आपल्याकडे ठेवण्यात यश मिळविले आहे, ही कौतुकाची बाब आहे. त्यामध्ये महाविद्यालयातील सर्व घटकांसह क्रीडापटूंनी घेतलेली मेहनत दिसून येते. विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी क्रीडाजगतात विद्यापीठाचा लौकिक उंचावण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, शारीरिक शिक्षण संचालक अमर सासने, प्रशिक्षक सुजय खोपडे, आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शनासाठी देण्यात येणारा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही.एम. पाटील यांच्यासह खेळाडूंना प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए.एम. शेख, डॉ. पी.टी. गायकवाड, अमर सासणे आदी.**

# खेळाडूंनी विद्यापीठाचा लौकिक वाढवावा

## कुलगुरू : मेघनाथ नागेशकर पुरस्काराचे न्यू कॉलेज मानकरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशप्रेमाची प्रचिती आणून देण्याची व देशाला एका धाग्यात गुंफण्याची ताकद खेळामध्ये आहे. विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी क्रीडा जगतात विद्यापीठाचा लौकिक उंचावण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शनासाठी देण्यात येणारा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार प्रदान समारंभात ते बोलत होते. कोल्हापुरातील न्यू कॉलेजने यंदा सलग चौथ्यांदा हा पुरस्कार पटकाविला आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महाविद्यालयाने सलग चार वर्षे चषक आपल्याकडे ठेवण्यात यश मिळविले आहे ही कौतुकाची बाब आहे. खेळण्याचे अनेक फायदे व आयाम आहेत, ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने 'खेलो इंडिया' उपक्रमाच्या माध्यमातून तरुणाईला तंदुरुस्त राखण्याकडे लक्ष पुरविले आहे. खेळांमुळे व्यक्तीमत्त्वाचा विकास होतो हे खरे आहे. संघ बांधणीचे बाळकडू व नेतृत्व विकास हे त्याचे फायदे आहेत. त्याचप्रमाणे आव्हाने स्वीकारण्याची व त्यांचे रुपांतर पुरस्कारांत करण्याची मोठी संधी क्रीडापटूंना असते.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही.एम. पाटील यांच्यासह निवडक क्रीडापटूंना या पुरस्काराप्रित्यर्थ देण्यात येणारा फिरता चषक प्रदान करण्यात आला.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. ए.एम. शेख, शारीरिक शिक्षण संचालक अमर सासणे, प्रशिक्षक सुचय खोपडे यांच्यासह खेळाडू उपस्थित होते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मोजक्या लोकांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला.

पुण्य नगरी



कोल्हापूर : न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंना पुरस्कार प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. शेख, डॉ. पी. टी. गायकवाड, अमर सासने आदी.

# खेळाडूंनी विद्यापीठाचा लौकिक वाढवावा

## कुलगुरू डॉ. शिर्के : न्यू कॉलेजला चौथ्यांदा मेघनाथ नागेशकर पुरस्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी विद्यापीठाचा लौकिक उंचावण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातर्फे २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शनासाठी देण्यात येणारा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार प्रदान समारंभात ते बोलत होते. येथील न्यू कॉलेजने यंदा सलग चौथ्यांदा हा पुरस्कार पटकावला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महाविद्यालयाने सलग चार वर्षे हा चषक आपल्याकडे ठेवण्यात यश मिळवले आहे, ही कौतुकाची बाब आहे. त्यामध्ये महाविद्यालयातील सर्व घटकांसह क्रीडापटूंनी घेतलेली मेहनत दिसून येते. यापुढेही प्रत्येक खेळाडूने मोठे ध्येय बाळगून कामगिरी करावी.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह निवडक क्रीडापटूंना फिरता चषक प्रदान करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडकर, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, शारीरिक शिक्षण संचालक अमर सासने, प्रशिक्षक सुचय खोपडे यांच्यासह खेळाडू उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : मेघनाथ नागेशकर पुरस्कार प्राचार्य व्ही. एम. पाटील व खेळाडूंना देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व अन्य.

# न्यू कॉलेजला नागेशकर पुरस्कार

कोल्हापूर, ता. २४ : "शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी क्रीडा जगतात विद्यापीठाचा लौकिक उंचावण्यासाठी योगदान द्यावे," असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठातर्फे सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शनासाठी देण्यात येणारा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार प्रदान समारंभात ते बोलत होते. न्यू कॉलेजने यंदा सलग चौथ्यांदा हा पुरस्कार पटकाविला.

डॉ. शिर्के म्हणाले, 'महाविद्यालयातील सर्व घटकांसह क्रीडापटूंनी घेतलेली मेहनत दिसून येते. केंद्र सरकारने 'खेलो इंडिया'द्वारे तरुणाईला तंदुरुस्त राखण्याकडे लक्ष पुरविले आहे. खेळांमुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.''

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. व्ही. एम. चव्हाण, क्रीडापटूंना फिरता चषक देण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, अमर सासने, सुजय खोपडे आदी उपस्थित होते.

# खेळाडूंनी विद्यापीठाचा लौकिक वाढवावा

## कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के : न्यू कॉलेज सलग चौथ्यांदा मेघनाथ नागेशकर पुरस्काराचे मानकरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी क्रीडा जगतात विद्यापीठाचा लौकिक उंचावण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार वितरण प्रसंगी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रदर्शनासाठी देण्यात येणारा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्काराने न्यू कॉलेजला सन्मानित करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंनी हा पुरस्कार स्विकारला. येथील न्यू कॉलेजने यंदा सलग चौथ्यांदा हा पुरस्कार पटकाविला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, न्यू कॉलेजने सलग चार वर्षे हा चषक आपल्याकडे ठेवण्यात यश



कोल्हापूर : क्रीडा महार्षी मेघनाथ नागेशकर पुरस्काराचा फिरता चषक न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील यांच्याकडे सुपुर्द करताना कुलगुरु डॉ. डि. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदि.

मिळविले आहे, ही कौतुकाची बाब आहे. त्यामध्ये महाविद्यालयातील सर्व घटकांसह क्रीडापटूंनी घेतलेली मेहनत दिसून येते. खेळण्याचे अनेक फायदे आहेत. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने 'खेलो इंडिया' उपक्रमाच्या माध्यमातून तरुणाईला तंदुरुस्त राखण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. खेळांमुळे व्यक्तीमत्वाचा विकास होतो. त्याचबरोबर देशप्रेमाची प्रचिती व देशाला एका धाग्यात गुंफण्याची ताकद खेळांत आहे. संघबांधणीचे बाळकडू व नेतृत्व विकास हे त्याचे अधिकचे फायदे आहेत. त्याचप्रमाणे आव्हाने स्वीकारण्याची व त्यांचे रुपांतर पुरस्कारांत करण्याची मोठी संधी क्रीडापटूंना असते. मिळालेल्या यशावर समाधानी न राहता अधिक मोठे ध्येय गाठण्यासाठी तयारी करणे, हे सच्च्या खेळाडूचे लक्षण आहे. त्या दृष्टीने प्रत्येक खेळाडूने मोठे ध्येय बाळगून कामगिरी करावी, असे आवाहन कुलगुरु डॉ. डी. टि शिर्के यांनी केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, शारीरिक शिक्षण संचालक अमर सासणे, प्रशिक्षक सुचय खोपडे यांच्यासह खेळाडू उपस्थित होते.

तरुण भारत Wed, 25 November 2020
https://epaper.tarunbharat.com/c/56589625

# महाविद्यालयीन शिक्षणाचा श्रीगणेशा कधी होणार?

## विद्यापीठास सरकारकडून अद्याप निर्देश नाहीत; विद्यार्थी, पालक संभ्रमात

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

नववी ते बारावीचे वर्ग २३ नोव्हेंबरपासून सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना आता महाविद्यालये, अधिविभाग सुरू होण्याची उत्सुकता लागली आहे. 'यूजीसी'ने कोरोनाचे सर्व नियम पाळून टप्प्याटप्प्याने विद्यापीठे व महाविद्यालये सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु शिवाजी विद्यापीठास महाविद्यालये व अधिविभाग सुरू करण्याबाबत राज्य सरकारकडून अद्याप कोणतेही निर्देश नसल्याने विद्यार्थी, पालक संभ्रमात आहेत.

कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे १६ मार्चपासून देशभरातील महाविद्यालये, विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्था बंद आहेत. परंतु राज्य शासनाच्या निर्णयानुसार २३ नोव्हेंबरपासून शाळा सुरू झाल्या आहेत. महाविद्यालय कधी सुरू होणार, असा प्रश्न विद्यार्थी व पालकांकडून विचारला जात आहे. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७२ महाविद्यालये असून दोन लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठास दिवाळी सुट्ट्या सुरू आहेत. अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षा **पान ४ वर**

> विद्यापीठ, महाविद्यालयास सध्या दिवाळीच्या सुट्ट्या सुरू आहेत. राज्य सरकारकडून महाविद्यालये आणि विद्यापीठातील अधिविभाग सुरू करण्याबाबत कोणतेच निर्देश आलेले नाहीत. सरकारच्या निर्णयानंतर महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातील प्रस्ताव विद्यापीठ अधिकार मंडळासमोर ठेवला जाईल, त्यानंतरच पुढील निर्णय होईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**



# महाविद्यालयीन शिक्षणाचा श्रीगणेशा कधी होणार?

**(पान १ वरून)** होऊन निकाल जाहीर झाले असून पदव्युत्तरचा प्रवेश सुरू झाला आहे. बारावीचा निकालानंतर विविध महाविद्यालयांनी त्यांची प्रथम वर्ष प्रवेश पूर्ण केली आहे. विद्यार्थ्यांना संस्थेत प्रवेश देताना प्रत्येकाच्या शरीराचे तापमान मोजले जाणार आहे. महाविद्यालये, अधिविभागात मास्क, सॅनिटायजेशनची यंत्रणा उपलब्धतेची तपासणी करण्यात येणार आहे. ताप, खोकला, श्वास घेण्यास त्रास होत असल्यास विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ नये. ऑनलाईन किंवा दुरुस्थ प्रणालीतील प्राधान्य देण्यात यावे. विद्यार्थ्यांमधील अस्वस्थतेबाबत संवाद साधला जावा, अशा सूचना 'यूजीसी'ने दिल्या आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोक विशेषत: मौजे नरंदे व मौजे सावर्डे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील व आजूबाजूच्या परिसरातील लोकांना व संस्थांना आमचे अशिलाने

## जाहीर नोटीस